

गरीब कापूस उत्पादकांचं दुःख सांगणारा: श्वेतअंगार



मध्यमवर्गीय शहरी जाणीवांना पार छेद देणारा लघुपट : आकडा

## आकडा आणि श्वेतअंगार

# जळजळीत वास्तव

मीना कर्णिक

पहिलंच दृष्य एका लहान मुलाचं. उंच वीजेच्या खांबापासून दूर अंतरावर असलेला हा मुलगा आकडा टाकून वीजेची वायर वळवू पाहतोय. तो तिथवर पोहोचत नाहीये. मग थोडं पुढे सरकणं. मग आणखी थोडं पुढे. आपल्या मनात भीती. अरे बाबा, पडशील!

दोन सेकंदांमध्ये प्रेक्षकांना विषयही कळतो आणि ते त्यात गुरफटूनही जातात. आणि मग समोर साकारतो दिग्दर्शक नंदू माधव यांचा दहा मिनिटांचा लघुपट, 'आकडा.' गावातल्या गरीब शेतकऱ्याचे वीजेवाचून होणारे हाल, त्याची असहाय्यता, त्यातही मधूनच निर्माण होणारा विनोद आणि शेवटी जिवावर उदार होऊन आकडा टाकून वीज चोरीशिवाय पर्याय नसलेलं धगधगतं वास्तव. आपल्यासारख्या मध्यमवर्गीय शहरी जाणीवांना पार छेद देणारं वास्तव.

हा संपूर्ण लघुपट अंधारातच आहे. एखादी मिणमिणती चिमणी सोबतीला. पण तीही या अंधाराची भयानकता वाढवणारी. प्रेक्षक म्हणून आपल्या डोळ्यांना त्रास देणारी आणि माणूस म्हणून वीज नसलेल्या गरीब, ग्रामीण शेतकऱ्याच्या दुःखाची जाणीव देणारी. ज्या एकांकिकेमुळे नंदू माधव यांना हा लघुपट करावासा वाटला त्या एकांकिकेमध्येही केवळ एक छोटासा कंदील वापरण्यात आला होता. त्या विषयी नंदू माधव म्हणतात, 'ही एकांकिका करणाऱ्या ग्रामीण भागातल्या त्या कलाकारांना मी म्हटलं, कंदीलाऐवजी तुम्ही स्टेजवर अंधाराचा इफेक्ट देणारा लाईट का नाही वापरलात? कंदीलात स्टेजवर काय चाललंय हे पाहताना थोडा त्रास होत होता. त्यावर त्याने उत्तर दिलं, तो त्रास तुम्हाला व्हावा हीच तर आमची इच्छा होती. लाईटच्या इफेक्टमुळे त्यात नाट्य आलं असतं, कंदीलामुळे त्यात खरेपणा आला. आम्हाला रोज असं वावरावं लागतंय, त्याचा किती त्रास होत असेल हे तुम्हाला कळावं हा आमचा हेतू होता.' स्वाभाविकच दिग्दर्शकानेही आपल्या लघुपटामध्ये तेच तंत्र वापरायचं ठरवलं आणि त्याचा परिणामही तोच झाला. काही वेळा समोरच्या व्यक्तीचा चेहरा पाहण्यासाठीही डोळे फाडून बघावं लागतं अशा स्थितीत कसं जगायचं? वीज नाही म्हणून पंपाने शेतीला पाणी घालता येत नाही तर काय खायचं?

कान चित्रपटमहोत्सवात स्थान मिळवणारा लघुपट म्हणून नव्हे तर मनाला चटका लावणारा अनुभव देणारा लघुपट म्हणून 'आकडा' बघायलाच हवा.

त्यानंतर लगेचच नंदू माधव यांचाच 'श्वेतअंगार' हा दुसरा लघुपट दाखवला गेला. इंडियन मॅजिक आयने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'आकडा'पेक्षा लांबीने थोडा मोठा आणि परिणामकारकतेच्या बाबतीत किंचित कमी असला तरी 'श्वेतअंगार'चं महत्त्वही नाकारता येणार नाही. गरीब कापुस उत्पादकांचं दुःख सांगणाऱ्या या चित्रपटाला व्यवस्थित अशी एक गोष्ट आहे. यात कॅमेराचा वापर आहे, फ्रेम्स चांगल्या कशा दिसतील याची काळजी घेतली आहे, पांढऱ्या शुभ्र कापसाच्या पार्श्वभूमीवर दारिद्र्याचे गडद डाग अधिकच उठून दिसले आहेत. पण महत्त्वाचं म्हणजे यामुळे विषयाचा भेदकपणा कमी झालेला नाही. 'आकडा'सारखा थेट प्रहार आपल्यावर होत नसला तरी या शेतकऱ्याची असहाय्यता आणि पिचलेपण जाणवल्यावाचून रहात नाही.

**ग्रामीण भागातल्या या शेतकऱ्यांसाठी आपण शहरात राहून फार काही करू शकत नाही. निदान त्यांच्या दुःखाची तीव्रता आपल्यापर्यंत पोहोचवणारे हे दोन लघुपट पाहण्याची संधी सोडू नका. येत्या शनिवारी संध्याकाळी सात वाजता पु. ल. देशपांडे कला अकादमीमधल्या मिनि थिएटरमध्ये 'महानगर'तर्फे या दोन्ही लघुपटांच्या शोचं आयोजन केलंय. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे. आपल्याकडून निदान तेवढं तरी!**

# views



When was there an enmity between us?

— Mayawati, when asked if she had turned her relationship with Sonia Gandhi into friendship after a dinner meeting she had hosted for the Congress chief

# Farmers' woes

## Two recent docu-dramas focus on the plight of suffering farmers in rural Maharashtra

One of the most eminent critics in the city, **Shanta Gokhale**, will separate the best from the banal on Mumbai's culturescape each week



Two short docu-dramas screened at Ravindra Natya Mandir on Friday bore stark witness to the life-and-death struggle of poor farmers in rural Maharashtra. The first film, *Aakda*, is shot practically without lights, in the dark of the night. The second, *Shwet Angaar*, under a blinding sun. Together they form a duet in black and white, which is deeply disturbing yet heartening too. For the films are as much about the impossible circumstances in which our poor live as about the grit with which they fight against them. Both are written by Rajkumar Tangde, a young man from Jamb Samarth, a village in Jalna district, and directed by actor Nandu Madhav.

About three years back, Nandu Madhav was invited to judge a one-act play competition in Aurangabad. That's where he saw a play called *Aakda*. Written, directed and enacted by Tangde, it made Madhav sit up and take notice. The play was performed in near darkness, lit only by a lantern. The audience had to strain to see it. But that is what Tangde had wanted — to make the audience experience, at least for the short duration of the play, what life without electricity meant.

The government cuts power when villagers fail to pay their electricity bills. Villagers fail to pay their bills because they don't have the money to do so. Without power to drive their pumps, their crops die. If their crops die, they die. Their only recourse then is to steal power, for which they use an *aakda*, or long hook. In the process, they run the risk of.

*Aakda* ends with Pandhari, the son of the protagonist Tatya, being electrocuted.

Nandu Madhav has based his film on this play. Shot with no more than one small light, it retains the all-pervading darkness of the play. Tatya, played by Tangde, takes a pragmatic view of the situation. If Kabir, a saint, could steal from the grocer to feed the holy men who were visiting him, why couldn't the farmers of Jamb Samarth steal from the government to feed themselves? This conflict between the individual and the state is fraught with dangers for the individual. The full implication of what this means is contained in the long scene where Pandhari, lying stomach down on a rooftop, inches forward bit by painful bit, toes braced against every available toehold, to reach out to a high tension wire with his hook.





**Directed by Nandu Madhav, *Aakda* is performed in near darkness. Madhav wanted to make the audience experience what life without electricity meant. *Shwet Angaar* is about the journey of a cotton farmer who has to push his bullock cart after it breaks down on the way to the market**

*Shwet Angaar* is a journey film also depicting man's bitter battle for survival. A cotton farmer's bullock cart breaks down on his way to the market. He is forced to make the remaining journey on foot, pushing an enormous bale of cotton over a distance of eight-and-a-half kilometres. His path lies over rocky ground, up and down inclines under a merciless sun. As he pushes the bale with his hands, feet and head, we foresee the tragic end of the journey. The bale is too large, the distance too long, the journey way beyond the capacity of any human being. But there is no choice. His little son needs medicines and the quintal of cotton he is pushing will buy them. He cannot wait for the government to procure his crop and pay for it in instalments. He must sell to the middleman and take whatever price he gets.

In the course of the journey, the bale of cotton grows into a malevolent force that thwarts the man at every turn. Each thread in the jute that binds the cotton and each sweating pore in the man's face and body become participants in this epic battle of unequal forces.

Cameraman Deepak Anjaria's shots crackle with tension. Milind Joshi, playing the man, brings an imploding intensity to his performance. By the end of the journey, he is like an exhausted jungle animal locked in a last ditch battle against a ruthless predator. Inevitably, the predator wins.

## letters to the editor

### Look at Indians now

It is unfortunate that Graham Ford ditched the BCCI ('Unaffordable', *MM*, June 12) after giving the impression that he would accept the offer. The Board has smelt a rat in his refusal and suspects that he has used the offer to jack up his bargaining power with Kent. The Board should have been professional enough to expect that such a thing could happen and kept a man in the waiting list.

It should learn and start looking within India for the job.

*V Subramanyan*

### No need for a coach

Senior players in the Indian cricket team seem to have a great say in the selection of a coach. It seems like students of a class are selecting their teacher! BCCI has already selected coaches for batting, bowling and fielding to rectify and polish each individual's kinks. What will a coach, Indian or foreign, do? In this scenario, what the team really needs is a stern disciplinarian who will weld the team into a cohesive fighting force.

*K Venkataraman*

### Not Ash's dosha

This is apropos the piece 'Holy Television' in Anil Thakraney's column (Ouch Potato) on June 12 . It is really weird that Aishwarya Rai is being blamed for Amitabh Bachchan's problems. What can Ash do if Amitabh Bachchan bought land illegally? I understand that, as they are public figures, the media has a right to discuss their lives. But to blame Ash (and her *kundali doshas*) for the trouble in Big B's life is simply disgusting. I don't think Chandrashekar Swamiji's words will have any impact on the Bachchans. But what is the Swamiji doing? If he is concerned about the Bachchans, he should have discussed the issue with the family in private.

Why can't the media concentrate on issues like global warming, harassment of women, etc.?

*Vidya*

*Want to be heard? Write in to us at mirrorfeedback@gmail.com*

५

औरंगाबाद,
बुधवार,
दि. २० जून
.२००७

लोकमत

आपलं औरंगाबाद



■ 'आकडा', 'श्वेतअंगार'चे दिग्दर्शक नंदू माधव श्रोत्यांशी संवाद साधताना.

# मसापमध्ये 'आकडा', 'श्वेतअंगार'चे प्रदर्शन

औरंगाबाद, दि.१९ (लोकमत ब्युरो)- फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात झळकून स्वकीयांसोबतच आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांची वाहवा मिळविणारा 'श्वेतअंगार' पाहण्यासाठी मसापच्या सभागृहात आज रसिक-श्रोत्यांनी चांगलीच गर्दी केली होती.

मुलाच्या आजाराला पैसे नसलेला शेतकरी कापसाचे मोठे गाठोडे साडेआठ किलोमीटर ओढत नेतो. कापूस विक्री केंद्रावर नेतो तेव्हा लालफितीच्या कारभारामुळे हतप्रभ होऊन परतीच्या प्रवासात गाठोड्याखालीच जीव गमावणारा, कापूस उत्पादकांची व्यथा संवेदनशीलपणे मांडणारा 'श्वेतअंगार' तसेच वीजचोरीच्या नादाने जीव गमावणाऱ्या नागरिकांच्या वृत्तीची चिरफाड करणाऱ्या 'आकडा' या लघुपटाने उपस्थितांना गंभीरपणे विचार करण्यास भाग पाडले.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने नंदू माधव दिग्दर्शित 'आकडा' व 'श्वेतअंगार' या दोन्ही लघुपटांचे प्रदर्शन आज आयोजित करण्यात आले होते. सुमारे अठरा मिनिटांचा 'आकडा' हा वीजचोरीवरील लघुपट, तर शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्त जीवनाचे वास्तव मांडणारा 'श्वेतअंगार' हा सुमारे पंचवीस मिनिटांचा लघुपट यावेळी दाखविण्यात आला. यावेळी दिग्दर्शक नंदू माधव व दोन्ही लघुपटातील सहकलाकार उपस्थित होते.

या प्रदर्शनानंतर नंदू माधव व सहकलाकारांनी उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. चित्रपटामागील भूमिका, पुढच्या प्रवासातील ध्येय आणि आंतरराष्ट्रीय प्रतिसादाबद्दल माधव भरभरून बोलले. ग्रामीण भागातील कलाकार पुढे आणण्याचा हा प्रयत्न असल्याचे माधव यावेळी म्हणाले. सध्याच्या चित्रपटातून ग्रामीण भाग, तेथील बोलीभाषा याविषयीचे खोटे चित्रण केले जात आहे. मात्र, येथे वास्तवता मांडण्याचा प्रयत्न मी केला असल्याचे ते एका प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले. त्याआधी मसापतर्फे नंदू माधव व सहकलाकारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रकाश त्रिभुवन, कुंडलिकराव अतकरे यांनी केले. कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक रा.रं. बोराडे, मसापच्या पदाधिकाऱ्यांसह शहरातील मान्यवर उपस्थित होते.